आ-वा २१६६
१५/५/८८

# दर्यावर्दी सिंदबाद

## आणि त्याच्या सात सफरी

(सफर पहिली)

-: लेखक :-

द. के. बर्वे

म. धों. रां. कर्वे, [illegible]

[illegible]

क्र. २१६६ दि. १५/५/८८

विषय [illegible]

दिलीपराज प्रकाशन

८५२ व १०१ रविवार पेठ, पुणे २.

किंमत एक रुपया फक्त.

दिलीपराज प्रकाशन

२९६६ दि. १५/४/५६

# दर्यावर्दी सिंदबाद

## सफर १ ली

बगदादवर हरून अल्-रशीद हा बादशहा राज्य करीत असे. या शहरात सिंदबाद नावाचा एक हमाल होता. ओझी वाहून तो आपले पोट भरीत असे. एकदा भर उन्हात सिंदबाद एक जड ओझे वाहून नेत असता थकून गेला. त्याच्या अंगातून घामाच्या धारा वाहात होत्या. तो अगदी थकून भागून गेला होता. उन्हाने हैराण झाला होता.

जाता जाता वाटेत त्याला एक मोठा वाडा दिसला. वाड्यासमोरचा रस्ता साफसूफ केलेला होता. नुकतेच पाणी मारलेले होते. या गारव्यात विश्रांती घेण्यासाठी सिंदबाद वाड्याच्या ओसरीवर बसला. सिंदबादची नजर सहज त्या वाड्याकडे गेली. आत राघू–मैना वगैरे पक्ष्यांचा किलबिलाट चालला होता. तो वाडा कोणा श्रीमंत सरदाराचा असा होता. आत नोकर–चाकर, दास-दासी व गुलाम यांची फुलबागेत ये–जा सुरू होती. आतून खमंग व चम-

चमीत पक्वान्नांचा घमघमीत वासही सुटला होता. हे पाहून सिंदबाद मनात म्हणाला, ‘ अल्ला, तू कोणाला गरीबीत ठेवतोस, तर कोणाला श्रीमंती करतोस. तुझ्या मनात काय आहे, ते मला कसं कळणार ? पण देवा, तुमची माझ्यावर कृपा असू दे ?’

सिंदबादने थोडी विश्रांती घेतली. मग बोजा पाठीवर घेतला आणि तो निघायच्या तयारीला लागला. तोच त्या वाडयातून एक मुलगा धावत येऊन सिंदबादला म्हणाला, ‘ अहो, माझा धनी तुम्हाला आत बोलावतोय. चला माझ्याबरोबर.’

या आमंत्रणाने सिंदबाद जरा बिचकला. मग त्या मुला बरोबर तो आत गेला. त्या मुलाने सिंदबादला एका मोठ्या भव्य महालात नेले. महालात दिव्यांचा लखलखाट होता. गादयागिरदया, गालिचे. लोड–तक्के मांडले होते. त्यावर उंची पोशाख केलेले अनेक अमीर–उमराव बसलेले होते. त्यांच्यासमोर छोटयाशा मेजावर खाद्यपदार्थांनी भरलेली ताटे मांडलेली होती. उंची मद्याच्या सुरया ठेवलेल्या होत्या. नोकरचाकर, वाढप करीत होते. या वाडयाचा धनी सर्वांच्या मध्यभागी एका उंचशा मखमली गादीवर लोडास रेलून बसला होता त्याचा चेहरा थोडा धीरगंभीर दिसत होता. त्याची पांढरी

शुभ्र दाढी व सर्वांवर शांतपणे फिरणारे घारे–टपोरे डोळे यामुळे सिंदबादच्या मनास त्या वाड्याच्या धन्याविषयी अत्यंत आदर निर्माण झाला.

आत येताच, सिंदबादने लवून सलाम केला. विनयाने मान लववून तो उभा राहिला. घरधन्याने त्याला खुणेने जवळ बोलावले. जेवणाचे ताट त्याच्यापुढे केले. हमाल सिंदबादला ‘ही प्रत्यक्ष देवाचीच कृपा’ असे वाटले. मालकाच्या आज्ञेने तो पोटभर जेवला. एवढी उंची पक्वान्ने उभ्या जन्मात आज तो प्रथमच खात होता. इतर सर्व पाहुणे मंडळीही खाद्यपदार्थांवर आडवा–उभा हात मारत होती.

जेवणे झाल्यावर सुंदर अशा मुलींनी वाद्यांच्या साथी-वर नृत्य केले. सर्वांची मने प्रसन्न झाली.

मग त्या वाड्याचा धनी सिंदबाद हमालाला म्हणाला, ‘अरे, तू एवढं जड ओझे घेऊन, एवढ्या उन्हात कुठं निघाला होतास ? काय नाव तुझं ? कुठं राहतोस ? काम-धंदा काय करतोस ?’

सिंदबाद जरा ओशाळला. मग त्याने आपण हमाली करून मरमरेतो कष्ट करतो, पण पोटापुरतेही धड मिळत नाही, अशी आपली दुर्दैवी कहाणी सांगितली.

यावर घरधन्याने त्याच्या पाठीवरून प्रेमाने हात फिरवीत म्हटले, 'अरे, नशीब म्हणून काही चीज आहे, हे खरं पण माणसाने हताश होता कामा नये. वेळप्रसंगी धाडसही दाखवले पाहिजे. माझंच पहा ना. तुला हा एवढा राजेशाही थाटमाट दिसतो ना, तो मला काय सुखासुखी मिळाला आहे ? अरे, एकदा–दोनदा नव्हे, सात वेळा मी माझा जीव धोक्यात घालून समुद्रावर सफरी केल्या आहेत. या जलप्रवाहात माझ्यावर जी प्राणसंकटे कोसळली, ती तू ऐकलीस, तर तू चाटच पडशील. मग आपल्या सर्व अमीर–उमराव पाहुणे मंडळीकडे नजर वळवून त्या घरधन्याने म्हटले, 'तुम्ही सर्वजण माझे समुद्रावरचे अजब अनुभव ऐकायला मोठे उत्सुक आहात, मग ऐका तर, मला कोणकोणत्या संकटांना तोंड द्यावे लागले ते !'

त्या घरधन्याने मग सिंदबाद हमालाला विचारले, 'अरे, विसरलोच मी, नाव काय तुझं ?'

सिंदबाद हमाल म्हणाला, 'माझं नाव, 'सिंदबाद हमाल' एक फाटका भुकेकंगाला माणूस !'

२७६६ ९८/९६

घरधन्याने त्याच्याकडे आश्चर्याने पाहात म्हटले, 'अरेच्या ! काय गंमत ! माझंही नाव सिंदबाद, या गावात माझे मित्र मला सिंदाबाद दर्यावर्दी म्हणून ओळखतात. तर मित्रा, तूही सिंदबादच आहेस. तुझंही नशीब एक दिवस खात्रीने उजळल्याशिवाय राहाणार नाही. आता ऐक माझी पहिल्या समुद्र प्रवासाची हकीकत !'

दर्यावर्दी सिंदबादने आपल्या सर्व मित्रांवर एकवार नजर फिरवली आणि सांगायला सुरुवात केली.

'माझे वडील मोठे व्यापारी होते. मी लहान असतानाच ते वारले. घरी खूप पैसाआडका व जमीनजुमला होता. पुढे मी कसलाही विचार न करता, सर्व पैसाआडका वाटेल तशी चैन करण्यात उडवून टाकला. जवळजवळ मी कफल्लकच झालो.


यापुढे आपण काहीतरी मिळवले पाहिजे, नाहीतर उपाशी मरावे लागेल असा विचार मी केला. व्यापार करायचे ठरविले. व्यापाराचा माल खरेदी केला. काही व्यापारी आपला माल घेऊन परदेशी बसरा या बंदरावर जाणार होते. त्यांच्याबरोबर मीहि माझा विक्रीचा माल बोटीवर चढवला. आम्ही सर्व व्यापारी मंडळी वाटेत अनेक बेटांवर पुन्हा थोडा थोडा मुक्काम केला. मालाची खरेदी

विक्री केली आनंदाने नफा कमावला. आम्ही प्रवासात बऱ्याच दिवसांनी एका बेटापाशी आलो. हिरव्यागार झाडाझुडपांनी हे बेट जणू काय पाचूचे बेटच वाटत होते. हे जणू नंदनवनच आहे, असे सर्वांना वाटले.

आमच्या बोटीने नांगर टाकला. आम्ही सगळीजण बेटावर उतरलो. काहीजणांनी लाकडे–फळकुटे जमविली. चुली पेटविल्या आणि स्वयंपाक सुरू केला. काहीजण बेटावर फिरायला गेले. काहीजण कपडे धुवायला, आंघोळीला गेले. मी एकटाच जरा पाय मोकळे करायला एका पायवाटेने चाललो होतो. काहीजण फराळाचे खाण्यापिण्यात रमले होते.

तोच–एकाएकी बोटीच्या कप्तानाची गगनभेदी आरोळी सर्वांच्या कानी पडली. ' अरे प्रवाशांनो, अरे खलाशांनो, धावा धावा ! चला–चला, लवकर बोटीत चढा. क्षणभरही उशीर लावाल, तर फुकट मराल. अरे बाबांनो, हे बेट नाही, हा आहे महाप्रचंड मोठा थोरला मासा आहे, मासा ! तो समुद्रात उभा राहिला आहे. त्याच्या पाठीवर वाळू साचून ती सगळी झाडेझुडपे वाढली आहेत. विस्तवाची धग लागून आत्ता लगेच मासा हलेल. त्याआधी झटकन बोटीवर चढा !

अचानक हे संकट आलेले पाहून सर्वजण घाबरेघुबरे झाले. भांडीकुंडी—सामानसुमान—खाद्यपदार्थ सगळेसगळे तेथेच टाकून जो तो प्राणभयाने बोटीवर पळाला. पण मी आणि इतर थोडे लोक बोटीपर्यंत पोचलो नाही. त्याआधीच ते बेट धाडदिशी हलले व क्षणात समुद्रात बुडाले. त्याबरोबर मी व इतर सर्वजण समुद्रात लाटांवर गटांगळ्या खाऊ लागलो. माझ्याखेरीज सर्व लोक पाहाता पाहाता समुद्रात बूडून गेले. माझीही तीच गत होणार होती, पण माझ्या नशिबाची दोरी घट्ट होती.



एक मोठे लाकडी टब लाटांवरून तरंगत तरंगत माझ्याकडे आले. खलाशी लोक यातच कपडे धूत असत.

धीर करून मी ते पकडले. त्याच्यावर टांग मारून चढलो. पायांची जोरजोरात वल्ही मारू लागलो. लाटा निर्दयपणे मला वाटेल तेथे भिरकावून देत होत्या.

आमच्या बोटीचे शीड मला दूरवर दिसत होते. बोटी-वर जे लोक चढले होते, त्यांना घेऊन कप्तानाने बोट हाकारली होती. ' त्या बोटीवर मला जाता आले, तर बहार होईल !' असे एकदा वाटले पण ते शक्य नव्हते बोटीपासून खूपच दूर समुद्रात मी गटांगळ्या खात होतो. शिवाय मी जिवंत आहे, हे तरी बोटीच्या कप्तानाला कोठून माहीत असणार ?

पाहाता पाहाता आमची बोट दूर–दूर जात अखेर दिसेनाशी झाली. अशातच सांज झाली. मग काळोखं पडला त्या काळोख्या रात्री, दुसरा सबंध दिवस माझा त्या टबाच्या ' होडी ' वरून बेछूट प्रवास चालूच होता. माझ्या हातापायात आता त्राण उरलेले नव्हते. मनोमन मी पर-मदयाळू अल्लाची करूणा भाकत होतो.

वाऱ्याने व लाटांनी मला दिवसभर ढकलत ढकलत अखेर एका बेटाजवळ नेले. त्या बेटावर प्रचंड वृक्ष होते. त्यांच्या फांद्या समुद्रात वाकल्या होत्या. मी एक फांदी पकडली. तिला लोंबकळत मी खूप धडपडीने अखेर जमि-नीवर माझे पाय टेकविले.

पायातून पेटके येत होते. माझे पायाचे तळवे माशांनी कुरतडले होते. अतिश्रमामुळे मन व शरीर बधिर झाले होते. मी धाड्कन जमिनीवर कोसळलो आणि बेशुद्ध झालो.

दुसरे दिवशी सूर्योदयाला मला जाग आली. जवळ जवळ बारा तास मी तिथे प्रेतासारखा पडून राहिलो. जाग आली, तरी पायात फारसे त्राण नव्हते. पाय सुकले होते. ढुंगणावर सरपटत, गुडघ्यावर रांगत, मी त्या बेटावर इकडे तिकडे फिरलो. बेटावर चांगली गोडमधूर फळे खायला मिळाली. झऱ्याचे थंडगार पाणी प्यायला मिळाले. तेव्हा माझ्या जिवात थोडा जिव आला. असेच काही दिवस गेले. अंगात ताकद आली. बेटावर हिंडून मी दिवस घालवी. रात्री झाडाखाली निजे. एकाझाडाची फांदी काढून मी टेकायला काठी बनविली. एके दिवशी मी समुद्रकिनाऱ्यावरून फिरत होतो. एके ठिकाणी दूरवर मला काहीतरी दिसले. कुणीतरी भयानक प्राणी तेथे असेल, अशा विचाराने मी भीतभीतच तेथे गेलो. पाहातो तो एक मोठी घोडी किनाऱ्यावर एका खुंटाला बांधलेली होती. मला पाहाताच ती मोठ्याने खिकाळली. तेवढ्यात जमिनीत एक भगदाड मला दिसले. घोडी खिकाळताच एक माणूस भगदाडातून बाहेर आला. मी घाबरून पळू लागलो. तो म्हणाला, ' अरे भिऊ नकोस. थांब. ' आम्ही कोणी चोर-

दरवडेखोर नाही. आम्ही सौदागार आहोत. तू कोण ? कसा आलास ? सरळ सांग. '

मग मी माझी सारी हकीकत सांगितली व म्हटले, ' मेहरबान माझ्यावर दया करा. ' माझी हकीकत ऐकून त्या माणसाला मोठे नवल वाटले, मग त्यानें आपली हकीकत सांगितली. तो म्हणाला, ' आम्ही राजा मिहिर-जान यांचे पोतदार आहोत. दर महिन्याला अमावस्येला आम्ही येथे आमच्या घोडचा घेऊन येतो. या खडकातील तळघरात त्या बांधून ठेवतो, रात्री येथे समुद्रातून भर-भक्कम पाणघोडे येतात.

रात्री आम्ही तळघरातच झोपतो. सकाळी आमच्या घोडचा घेऊन परत देशाला जातो. यामुळे आमच्या घोडचा गाभण्या होतात. यामुळे आम्हाला खानदानी घोडचांची भरपूर पैदास करता येते. आज आम्ही येथेच राहू. उद्या परत आमच्या देशाला जाणार आहोत. तुला आमच्याबरोबर यायचं असलं, तर खुशाल ये. राजा मिहिरजानचा दरबारही तुला पाहायला मिळेल ! '

मला तरी दुसरे काय हवे होते ? मी त्यांचे म्हणणे आनंदानें मान्य केले, रात्री मला त्यांनी खाणेपिणे दिले, मी तळघरातच त्यांच्याबरोबर राहिलो, अजस्र व बला-ढचा पाणघोडेही मला तेथे प्रथमच पाहायला मिळाले,

सकाळी ते घोडचा घेऊन निघाले, मलाही त्यांनी बसायला

एक घोडी दिली, घोड्यावरून मजल दरमजल करीत मी त्यांच्या बरोबर मिहिरजानच्या राजधानीत पोहोचलो, त्यांनी मला राजासमोर नेऊन उभे केले, कुर्निसात करून मी माझ्यावर कोसळलेल्या संकटाची हकीकत राजापुढे थोडक्यात निवेदन केली, राजाला ती ऐकून फार नवल वाटले, राजा म्हणाला, 'मुला एवढ्या प्राणसंकटातून तू वाचलास, ही केवळ अल्लाची कृपा.'

राजाने मला बंदराचा अधिकारी नेमले, जाणाऱ्या येणाऱ्या बोटींची नोंद करणे, मालावर नज़र ठेवणे, जकात घेणे वगैरे कामात माझा वेळ चांगला जाऊ लागला. हळूहळू मी गावातले व्यापारी, प्रवासी, तसेच बंदरावरचे खलाशी त्यांच्याकडे बगदाद बंदराबद्दल वारंवार चौकशी करीत असे. माझ्या मायदेशला जायला मी फार उतावीळ झालो होतो. पण काहीच ठावठिकाणा लागत नव्हता, म्हणून मी दुःखीकष्टी झालो होतो.

एकदा मी मिहिरजान राजाच्या दरबारी गेलो होतो. तेथे काही हिंदी व्यापारी मला भेटले. त्यांच्यात एकूण सत्तावीस जातीचे लोक होते. काही ब्राह्मणही त्यात होते. ब्राह्मण दारू पीत नाहीत. ऊंट, घोडे, गाईगुरे अशी जनावरे बाळगतात, वगैरे माहिती मला मिळाली, त्यांच्याकडूनही बगदादचा काही पत्ता लागला नाही. समुद्रावर मी अनेक प्रकारचे मासे पाहात असे. दोनशे हात लांबीचा एक अक्राळ-विक्राळ मासा पाहिला. तसेच घूबडासारखे डोके असलेला

मासाहि मला आढळला. हे सर्व पाहातांना मला नवल वाटे पण घरी जायची ओढ सतत लागे. त्यामुळे मी बेचैन असे.

एके दिशी माझा दंडा हाती घेऊन मी बंदरात उभा होतो. तितक्यात एक मोठी थोरली बोट बंदराला येऊन लागली. व्यापारी लोक आपापला माल उतरवून घ्यायला लागले. उतरलेल्या मालाची नोंद बराच वेळ मी घेतली मग विचारले, ‘ बोटीवरला सगळा माल खाली उतरवलात ना ? का आता काही शिल्लक आहे ?’

बोटीचा कप्तान उतरला, ‘ साहेब, आत अजून काही माल शिल्लक आहेत. त्या मालाचा धनी समुद्रात बुडून मेला. म्हणून ते सामान आम्ही खाली उतरवले नाही. ते कोठेतरी विकून टाकून येतील ते पैसे त्याच्या बायको व पोरांना मी देणार आहे.’

‘ कोण तो माणूस ? काय नाव त्या व्यापाऱ्याचं ?’ तो कप्तान म्हणाला, ‘ बगदादचा सिंदबाद दर्यावर्दी ! ’ अचानक माझेच नाव त्यांच्या तोडून निघताच, मी त्याच्याकडे बारकाईन निरखून पाहिले. तो आमच्याच बोटीचा कप्तान होता. याचे मला चटकन स्मरण झाले. मी ओरडून म्हणालो, ‘ अरे मीच तो सिंदबाद दर्यावर्दी ! मला कसे नाही ओळखलंस ?’

पण मी जिवन्त असेन, यावर कप्तानाचा विश्वास बसणे शक्यच नव्हते. म्हणून तो रागारागानें मला म्हणाला, ‘ अरे भामट्या, बराच बदमाश दिसतोस तू ! सिंदबाद

तो मीच असे सांगून बोटीवरचा उंची माल उपटायचा तुझा बेत दिसतो. पण बच्चमजी, मीहि काही एवढा साधा-भोळा नाही. तुला तोच सिंदबाद मानायला सिंदबाद तर आमच्या डोळ्यादेखत समुद्रात बूडून मेला.'

बोटीच्या कप्तानाला व इतर व्यापाऱ्यांना मीच सिंद-बाद ही खात्री पटवण्यासाठी बेटासारखा प्रचंड मासा समुद्रात बुडाला, तेव्हापासूनची पुढील सर्व हकीकत मी तपशीलवार सांगितली. तरीही कप्तानाचा माझ्या बोल-ण्यांवर विश्वास बसेना. तेव्हा कप्तान आणि मी या दोघांनाच फक्त माहीत असलेल्या पूर्वीच्या काही खाजगी घटनांची आठवण त्याला करून दिली तेव्हा मात्र त्याची खात्री पटली. माझी ओळख पटल्यावर त्याला अत्यानंद झाला मला त्याने आनंदाने कवटाळलें. माझे सर्व सामानसुमान जसेच्या तसे मला दिलें. त्यातून काही उंची वस्तूंचा मी राजा मिहिरजानला आहेर केला आणि त्याचा निरोप घेऊन त्या बोटीवरून बगदादकडे निघालो.

राजा मिहिरजानने मला कापडचोपड वगैरे देऊन माझा सन्मान केला व मला निरोप दिला. बरेच दिवस प्रवास करीत आम्ही अखेर बसरा बंदरावर पोहोचलो. तेथून आणखी पुष्कळ सामान उंटावर लादून मी आशिया माझी मायभूमी बगदाद येथे सुखरूप परत आलो.

वाटेत व्यापारावर मला पैसाअडका भरपूर मिळाला होता. मी स्वत:साठी टोलेजंग वाडा बांधला- शिवाय घरे, बागा, शेतजमिनी खरेदी केल्या. दासदासी, नोकर-

चाकर ठेवलें. काही सुंदरश्या बटक्या व हबशी गुलाम तैनातीसाठी खरेदी केलें. खाणेपिणे–नाचरंग–तमाशा, मदिरापान या चैनीत मी रमून गेलो. काही दिवसातच मला मी भोगलेल्या संकटाचा विसर पडला.

पण ही ऐषआरामी संतत बरी वाटेना असे ऐंदीप्रमाणे नामर्दाचे जीवन घालवण्यात मजा नाही, असे सतत वाटू लागलें. आपल्याकडे भरपूर पैसा आहे, आपण जगप्रवास करावा, नाना देश, नाना लोक पाहावेत आणि भरपूर अनुभव घेऊन आपलें वैभव वाढवावे. असे मी मनाशी ठरवलें.

अखेर मी जवळ जवळ सगळा पैसा खर्चून व्यापाराचा माल खरीदला. बंदरावर एक नवे कोरे मजबूत जहाज तयार होते. त्यावर सामानसुमान चढवलें, खायप्यायचे सामान भरपूर घेतलें, जहाजशिडे मजबूत होती व खलाशी अनुभवी होते. त्यामुळे वादळात जहाज बुडण्याची मुळीच भीती वाटत नव्हती. अशाप्रकारे दुसऱ्या खेपेस मी सफरीवर निघालो.

पण या सफरीतही सगळे काही निर्वेधपणे पार पडले नाही. पुन्हा प्राणसंकटे कोसळली आणि पूर्वीपेक्षाही चित्तथरारक असे नवनवे विचित्र अनुभव मला आलें ! मित्रानो, उशीर बराच झालाय. या दुसऱ्या सफरीची विलक्षण हकीकत ऐकायला तुम्ही सर्वजण फार उत्सुक आहात, पण आता उद्या संध्याकाळी इथं या. मजेने जेवता जेवता उद्या माझी ही कथा सांगेन.

BVBK-0402167